# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/11/2022 (मंगळवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग

पो.स्टे. कळमेश्वर :- अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा मीश्रा भवन एम.आय.डी.सी. कळमेश्वर येथे दिनांक ०८/०९/२०२२ चे ०८.०० वा. ते दिनांक ०८/११/२०२२ चे १२.३० वा. चे सुमारास यातील पिडीत मुलगी व आरोपी हे एकाच घरी राहात असुन यातील पिडीत मुलगी वय ९ वर्ष ही आरोपी नामे- राजू मुनीश्वर दास, वय २५ वर्ष, रा. मिरट्टी, ता. आब्जु गंज, जिल्हा भागलपूर(बिहार), ह. मु. मानकर मिश्रा भवन, नाका नंबर ०५, एम.आय.डी.सी कळमेश्वर हे फिर्यादी यांचे घरी किरायाने एकाच घरात राहत असुन, नात्याने आरोपी बाप व पिडीता लेक लागतात. मागील दोन महिन्यापासुन यातील आरोपी पिडीतावर लैंगीक अत्याचार करीत असुन, दिनांक ०८/११/२०२२ चे ००.३० वा. सुमारास यातील पिडीत व फिर्यादी हे खाटेवर आणि आरोपी खाली कंबलवर झोपुन असता, यातील आरोपी याने पिडीता अल्पवयीन मुलीचा फायदा घेत, तिला आपले जवळ झोपवुन पिडीत मुलगी व स्वत:चे कपडे काढुन, तिचेशी शारीरीक संबंध प्रस्थापीत करून बळजबरीने जबरी संभोग केला. सदरचा प्रकार फिर्यादीने पाहला, तेव्हा फिर्यादीने हटकले असता, आरोपीने सदर बाब कोणाला सांगु नको, नाहीतर जिवाने मारून टाकण्याची धमकी दिली. अश्या फिर्यादीचे तोंडी रिपोटवरून सदर गुन्हा नोंद करून घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. अंजनी राजू दास, वय २५ वर्ष, रा. मिरट्टी, ता. आब्जु गंज, जिल्हा भागलपूर (बिहार), ह मु. मानकर मिश्रा भवन, नाका नंबर ०५, कळमेश्वर यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२)(एफ),३७६(२)(आय), ३७६(२)(जे),३७६(२)(एन),३७६(ए) (बी) भादवि, सहकलम ४,५(एल),५(एम),५(एन),६ पोक्सो भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन कळमेश्वर करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :- अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा एन.एच.५३ महामार्ग खापरी बारोकर शिवार येथे दिनांक ०७/११/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान यातील आरोपी व मृतक हिरो होन्डा पॅशन मोटरसायकल क्र. एम.एच/३२,के-३०७८ चा चालक हा दुचाकी वाहन एम.एच.३२/के-३०७८ ने विरुद्ध दिशेने आपल्या ताब्यातील वाहन बेदारकपणे व रॉग साईडने चालवुन स्वतहाच्या मृत्यु व इतराच्या जखमी होण्यास कारणीभुत झाला आहे.

सदर प्रकरणी सतिश छत्रपाल रबडे, वय ४१ वर्ष, रा. चंदनपारडी ता. काटोल जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे मृतक आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (ए) भादवी, १८४, ०४, १२२ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन कोंढाळी करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर